# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः07.06.2025** **वारःशनिवार**

---

1. सर्व प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्याप्रती ब्रिक्स नेत्यांची वचनबद्धता
2. पॅलेस्टिनी सशस्त्र गट हमासशी युद्धबंदी- ओलिस करारासंदर्भात चर्चा आणि वाटाघाटी करण्यासाठी इस्रायलचं पथक कतारला रवाना
3. मुंबई विमानतळावर तस्करांकडून एकंदर अकरा कोटी रुपये किंमतीचा गांजा, जीवंत आणि मृत वन्यजीव आणि सोने हस्तगत
4. जागतिक मुष्टीयुद्ध करंडक स्पर्धेत, साक्षी चौधरीची सुवर्ण कामगिरी. आणि
5. अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट स्पर्धेचा दूसरा सामना 336 धावांनी जिंकत भारतानं नोंदवला ऐतिहासिक विजय.

**<u>ब्राझील-ब्रिक्स-पंतप्रधान</u>**

ब्राझीलमध्ये रिओ द जानेरो इथं सुरू असलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत 'द लीडर्स डिक्लेरेशन' या महत्त्वपूर्ण निर्णयामध्ये 22 एप्रिल रोजी जम्मू आणि काश्मिर इथं, 26 नागरिकांचा बळी घेणाऱ्या हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला. सीमापार दहशतवाद, दहशतवादाला होणारा वित्तपुरवठा आणि सुरक्षित आश्रयस्थान या सर्व स्वरुपातल्या आणि सर्व प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्याप्रती ब्रिक्स नेत्यांनी आपली वचनबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली. दहशतवादासंदर्भात शून्य सहिष्णूतेचे धोरण सुनिश्चित करण्याचे तसेच दहशतवादाचा सामना करण्यामधील दुहेरी निकषांना नाकारण्याचे आवाहन केले.

या परिषदेत शांतता आणि सुरक्षितता यावरील सत्राच्या सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवादाच्या धोक्याचा मुद्दा उपस्थित करत पहलगाम हल्ल्याच्या तीव्र निषेधाबद्दल आणि भारताविषयी एकजूट दाखवल्याप्रती, ब्रिक्स सदस्य देशांचे आभार मानले. भारताची ओळख, प्रतिष्ठा यांच्यावरील हा हल्ला होता असे सांगून हा हल्ला केवळ भारतावर नसून मानवतेवरील हल्ला असल्याचं प्रतिपादन त्यांनी केल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. या सत्रामध्ये, भारत संघर्ष सोडवण्यासाठी आणि जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी संवाद आणि राजनैतिक कूटनीतीचे समर्थन करत असल्याचं पंतप्रधानांची स्पष्ट केलं.

**<u>पंतप्रधान संपर्कसत्र</u>**

या दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बहुपक्षवाद, आर्थिक-वित्तीय व्यवहार आणि कृत्रिम बुद्धीमत्ता या विषयावरील संपर्क सत्रात सहभाग घेतला. ब्रिक्स संघटना जागतिक सहकार्य आणि बहुध्रुवीय जगासाठी उत्प्रेरक असल्याचं मोदी यावेळी बोलताना नमूद केलं. नव विकास बँक संचलित प्रकल्पांमध्ये मागणी आधारीत दृष्टीकोन आणि दीर्घकालीन आर्थिक स्थिरतेचा आग्रह धरला. तसेच ब्रिक्स विज्ञान आणि संशोधन भांडार निर्माण करण्याचे आवाहनही केले. तसेच पुढील वर्षी भारताच्या आयोजनाअंतर्गत होणाऱ्या कृत्रिम बुद्धीमत्तेच्या परिणामांवर आधारित परिषदेचे आमंत्रण ब्रिक्स सदस्य देशांना दिले.

**<u>मलेशिया क्युबा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही देशांच्या राष्ट्रप्रमुखांच्या ब्राझीलमध्ये स्वतंत्र भेटी घेतल्या. मलेशियाचे राष्ट्राध्यक्ष अन्वर इब्राहिम यांच्याशी झालेल्या भेटीत संरक्षण, दहशतवाद विरोध, शिक्षण, व्यापार, गुंतवणूक आणि औषध निर्मिती यांसह उभय देशांदरम्यानच्या व्यापक धोरणात्मक भागीदारीसंदर्भात प्रगतीचा आढावा घेतला. आसियान भागीदारीविषयीही दोन्ही

नेत्यांनी चर्चा केली. त्यानंतर क्युबाचे अध्यक्ष मिगुएल डियाझ-कॅनेल बर्मुडेस यांचीही भेट घेतली. भेटी दरम्यान दोन्ही नेत्यांनी आर्थिक सहकार्य, जैवतंत्रज्ञान, औषधनिर्माण, आयुर्वेद आणि पारंपारिक औषध, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि यूपीआय, आपत्ती व्यवस्थापन आणि क्षमता बांधणी या क्षेत्रांसह भारत-क्युबा संबंधांच्या विविध पैलूंवर विचार विनिमय केला.

ज**यशंकर**

दरम्यान, ब्रिक्स शिखर परिषदेला समांतर, परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी विविध देशांच्या समपदस्थ नेत्यांच्या भेटी घेतल्या. त्यामध्ये इराणचे समपदस्थ सईद अब्बास अराघची यांची भेट घेऊन सद्यपरिस्थितीतील स्थानिक हालचालींविषयी उभय नेत्यांमध्ये चर्चा झाल्याचं समाजमाध्यमांवरून दिलेल्या संदेशात जयशंकर यांनी म्हटलं आहे. तर, मेक्सिकोचे परराष्ट्र व्यवहार सचिव जुआन रेमॉन दी ला फुएन्टे यांचीही त्यांनी भेट घेतली. भारत- मेक्सिको दरम्यान झालेल्या चर्चेत आरोग्य, डिजीटल, तंत्रज्ञान आणि अवकाश या विषयांवर भर देण्यात आला. जयशंकर यांनी रशियाचे समपदस्थ सर्गेई लावरोव यांचीही भेट घेतली. उभय नेत्यांनी द्वीपक्षीय सहकार्य, पश्चिम आशिया, ब्रिक्स आणि शांघाय सहकार्य संघटना आदी विषयांवर चर्चा केल्याचं जयशंकर यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात नमूद केलं आहे.

**इस्राइल चर्चा**

इस्रायलने पॅलेस्टिनी सशस्त्र गट हमासशी युद्धबंदी- ओलिस करारासंदर्भात चर्चा आणि वाटाघाटी करण्यासाठी काल कतारला पथक पाठवलं आहे. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर, इस्रायलने हे चर्चेचे आमंत्रण स्वीकारलं असल्याचं इस्रायलच्या पंतप्रधान कार्यालयानं एका निवेदनात म्हटले आहे. गाझामध्ये ओलिस ठेवलेल्या इस्राईली नागरिकांच्या सुटकेसाठी कतारच्या प्रस्तावावर आधारित वाटाघाटी सुरू ठेवण्यास इस्रायलने सहमती दर्शविली आहे. या प्रस्तावात 60 दिवसांची युद्धबंदी, आणि पाच टप्प्यात ओलिसांची सुटका ज्यामध्ये 10 जीवित व्यक्ती आणि 18 जणांचे मृतदेह सोपवणे तसेच इस्रायली तुरुंगातील पॅलेस्टिनी कैद्यांची सुटका यांचा समावेश असल्याचं वृत्त आहे. शुक्रवारी, हमासनं एका निवेदनात म्हटलं आहे की त्यांनी गाझा युद्धबंदीच्या प्रस्तावावर मध्यस्थांना सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

**सीमाशुल्क जप्ती**

मुंबई सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर जप्तीच्या तीन मोठ्या प्रकरणांमध्ये चार जणांना अटक केली. जप्तींमध्ये गांजा, तस्करी केलेले जीवंत आणि मृत वन्यजीव आणि सोने यांचा समावेश असून याची एकत्रित किंमत 11 कोटी रुपयांहून अधिक आहे. पहिल्या प्रकरणात, सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी बँकॉकहून येणाऱ्या एका भारतीय नागरिकाकडून सुमारे 9.662 किलो गांजा, दुसऱ्या प्रकरणात, बँकॉकहून येणाऱ्या प्रवाशाच्या सामानात 3 प्रजातींच्या 30 जिवंत आणि 14 मृत वन्यजीवांचे नमुने आढळले. या प्रजाती भारतीय नसल्यामुळे, जिवंत प्राण्यांना त्यांच्या मूळ देशात पाठवण्यासाठी एअरलाइन कर्मचाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. तर, तिसऱ्या घटनेत, दुबईहून येणाऱ्या दोन प्रवाशांकडून सुमारे दीड किलो सोने जप्त करण्यात आले.

**विम्बल्डन-पूल-लौकिका**

विम्बल्डन टेनिस स्पर्धेत, भारताचा युकी भांब्री, अमेरिकन जोडीदार रॉबर्ट गॅलोवेसह, आज पुरुष दुहेरीच्या तिसऱ्या फेरीत खेळेल. या स्पर्धेत टिकून असलेला भांब्री हा एकमेव भारतीय खेळाडू आहे.

**पॅरा-तिरंदाजी सुवर्ण**

बीजिंगमधील आशियाई पॅरा-तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत, जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी असलेल्या तसंच पॅरालिम्पिक विजेतया हरविंदर सिंगने काल दोन सुवर्णपदके जिंकली, यामुळे भारताला पदक तालिकेत दुसरे स्थान मिळाले आहे. चीन पहिल्या स्थानावर आहे. हरविंदर सिंगने रिकर्व्ह तिरंदाजी प्रकारात पुरुषांच्या पात्रता फेरीत 663 गुण मिळवत नवीन विक्रम प्रस्थापित केला. तसंच त्यानं संघातील सहकारी भावनासह रिकर्व्ह खुल्या मिश्र सांघिक स्पर्धेत पहिलं सुवर्णपदक जिंकले आणि त्यानंतर रिकर्व्ह पुरुष खुल्या जेतेपदात आणखी एक सुवर्णपदक जिंकत तीन पदकांची यशस्वी कामगिरी पूर्ण

केली.भारताच्या महिला संघातील शीतल देवी आणि ज्योती यांनी देखील चीनच्या लू झांग आणि जिंग झाओचा पराभव करून सुवर्णपदक जिंकले.

**<u>मुष्टीयुद्ध</u>**

कझाकिस्तानच्या अस्ताना इथं झालेल्या दुसऱ्या जागतिक मुष्टीयुद्ध करंडक स्पर्धेत, भारताच्या युवा विश्वविजेत्या साक्षी चौधरीने महिलांच्या 54 किलो वजनी गटात भारताला पहिले सुवर्ण पदक मिळवून दिले. अंतिम फेरीत अमेरिकेच्या योसेलिन पेरेझची 5-0 असा दमदार पराभव केला. दरम्यान, या स्पर्धेत इतर तीन भारतीय मुष्टियोद्ध्यांना रौप्यपदकावर समाधान मानावं लागलं, महिलांच्या 48 किलो वजनी गटात मीनाक्षी, महिलांच्या 80 किलो वजनी गटात पूजा राणी आणि पुरूषांच्या 85 किलो वजनी गटात जुगनू यांचा समावेश आहे

**<u>क्रिकेट</u>**

इंग्लंडमधल्या बर्मिंगहॅम इथं झालेल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट स्पर्धेचा दूसरा सामना भारतानं 336 धावांनी जिंकून ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. या विजयामुळे भारतानं  मालिकेत 1-1 बरोबरी साधली आहे. धावांचा विचार करता भारताचा हा परदेशातील सर्वांत मोठा विजय ठरला आहे. तर भारतानं प्रथमच कसोटीत 1 हजार पेक्षा धावा केल्या आहेत. काल सामन्याच्या पाचव्या आणि शेवटच्या दिवशी इंग्लंडने 3 बाद 72 धावांवरून डाव सुरू केल्यानंतर  विजयासाठी 608 धावांचं उद्दिष्ट गाठताना यजमान संघाचा डाव 271 धावांवर आटोपला. आकाशदीपने दुसऱ्या डावात 6  बळी घेत या कसोटीत एकंदर 10 बळी घेतले. या सामन्यात दोन शतक ठोकणाऱ्या आणि अशी कामगिरी करणारा तिसरा भारतीय फलंदाज ठरलेल्या शुभमन गिल याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. कोणत्याही आशियाई संघाने बर्मिंगहॅममध्ये कसोटी जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. तिसरा कसोटी सामना येत्या 10 जुलैपासून लंडनमधल्या लॉर्ड्स मैदानावर होणार आहे.

**<u>हवामान</u>**

भारतीय हवामान विभागानं, महाराष्ट्रातील पालघर आणि पुणे जिल्ह्याच्या घाट परिसरासाठी हवामान विभागानं अतिवृष्टीचा लाल बावटा जारी केला आहे. इतर अनेक जिल्ह्यांना दक्षतेचा इशारा दिला आहे. दरम्यान, येत्या सहा- सात दिवसांत वायव्य आणि ईशान्य भारत, छत्तीसगड, विदर्भ आणि मध्य प्रदेशच्या पूर्व भागात तसंच देशाच्या पश्चिम किनारपट्टीच्या भागात मुसळधार ते अति मुसळधार स्वरूपाचा पाऊस पडेल असा अंदाज भारतीय हवामान विभांगांम व्यक्त केला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार